# ४. ऐच्छिक उपक्रम

## (अ) उत्पादक क्षेत्रे

### (१) क्षेत्र : अन्न

### १.१ परसातील बागकाम

निरनिराळ्या भाज्यांची व फळांची नावे ओळखणे.



### माझी कृती

भाज्या व फळे यांची चित्रे आणि फळांच्या बिया जमवणे.

भाज्या आणि फळे यांची चित्रांद्वारे ओळख करून देणे. फळांच्या बियांचा संग्रह करून घेणे.

## १.२ कुंडीतील लागवड

### विविध कुंड्यांचा परिचय




## माझी कृती

कुंड्यांचे वेगवेगळे आकार असलेली चित्रे जमवून चिकटवणे.

कुंड्यांच्या आकारानुसार त्यांची नावे विद्यार्थ्यांना समजावून सांगावीत. रंगीत चित्रे, व्हिडीओ यांचा वापर करावा.

## १.३ कुंडीचे आकार आणि रोपे यांची ओळख.

भाजीपाला, फळभाज्या आणि फुलझाडे यांची कुंडीमधील लागवड



फळभाज्या, पालेभाज्या, फुलझाडे यांची कुंडीतील लागवडीची चित्रे दाखवावीत.


## १.४ फळप्रक्रिया

### (अ) फळबाजाराला भेट – चित्र गप्पा



## माझी कृती

**चित्र रंगवणे.**



चित्रावरून विद्यार्थ्यांना वर्णन करण्यास सांगावे. चित्र रंगवून घ्यावे.

## (ब) चित्रांवरून फळे ओळखणे




### माझी कृती

फळांची चित्रे काढा, ती रंगवा.

विद्यार्थ्यांना फळांची चित्रे हाताळू द्या. चित्र ओळख असा खेळ खेळू द्या.

## १.५ मत्स्य व्यवसाय

### पाण्यातील प्राण्यांची ओळख



## माझी कृती

माशाचे विविध अवयव ओळखणे.




विद्यार्थ्यांना पाण्यात राहणाऱ्या प्राण्यांची चित्रांद्वारे ओळख करून द्यावी. माशाचे विविध अवयव ओळखायला सांगावे.

## (२) क्षेत्र : वस्त्र

## २.१ वस्त्रनिर्मिती

### कपड्यांविषयी संवाद

**चिंटूची गोष्ट (चित्रकथा)**




चित्रातील कपड्यांविषयीचा संवाद अभिनयासह म्हणून घ्यावा.

## माझी कृती

कापसाच्या रोपांना वाढीनुसार योग्य क्रम द्या.





कापसाचे पान



कापसाचे फूल




सरकी


चित्रांचा क्रम योग्य पद्धतीने जुळवून घ्यावा.


## २.२ प्राथमिक शिवणकाम

ऋतू आणि कपडे









शिवणकामाशी संबंधित साधने.

## माझी कृती

सुई, बटन आणि दोरा यांची चित्रे काढा.

चित्रे दाखवून ऋतू आणि कपडे यांची ओळख करून द्यावी. कपडे शिवण्यासाठी उपयुक्त साधनांची ओळख करून द्यावी. मऊ, खरखरीत अशा विविध कपड्यांच्या तुकड्यांचा स्पर्श अनुभवू द्यावा.

## कपड्याचे विविध भाग


जोड्या जुळवून पहा.






## माझी कृती

रंग आणि रंगीत धागे यांच्या जोड्या लावणे.





पेन्सिलने कपडे आणि त्यांचे भाग यांच्या जोड्या जुळवण्यास सांगावे. रंग आणि धागा एकमेकांशी योग्य प्रकारे जोडून घ्यावे.


## २.३ बाहुलीकाम


चित्र व कागदी पुठ्ठा यांच्यापासून बाहुली











## माझी कृती

वृत्तपत्रे, मासिके यांतली रंगीत चित्रे जमवून त्यापासून अंगठी बाहुली तयार करणे.

अंगठी बाहुली आणि कठपुतळी बाहुली तयार करण्याची पद्धत सांगा आणि वेगवेगळ्या बाहुल्या तयार करून घ्याव्यात.

## २.४ काथ्याचे विणकाम

नारळाच्या झाडाच्या विविध भागांची आणि त्यापासून तयार होणाऱ्या वस्तूंची ओळख.



## माझी कृती

नारळाच्या झाडाचे निरीक्षण करून, आपल्या शब्दांत वर्णन करणे.

नारळाच्या झाडापासून तयार होणाऱ्या विविध वस्तूंची नावे सांगणे.

नारळाच्या झाडाच्या विविध भागांची ओळख करून द्यावी. त्यापासून तयार होणाऱ्या विविध वस्तूंची चित्रे दाखवून वर्णन करून घ्यावे.

## ३. क्षेत्र : निवारा

## ३.१ मातकाम

### मातीचे गाणे (बडबडगीत)

आई म्हणते –
'बाळा, बाळा, काय करतोस?'
बाळ म्हणतो –
'आई, मी अंगणात खेळतो!'

आई म्हणते –
माती घेऊन खेळू नको।
अंग सारे मळवू नको।।
बाळ म्हणतो–
अगं, अगं आई
काय तुझी घाई
खेळू दे ना मला
मी येत नाही।।



मातीचा चेंडू, मातीची माऊ
मातीचा काऊ, मातीची चिऊ
मातीचा ससा मी करतो
हाक नको मारू मला, मी खेळतो ।।

### माझी कृती

भिजवलेल्या मातीपासून गोल, लांबट, चौकोनी आकाराचे लहानमोठे मणी तयार करा.

मातीविषयी गाणी संग्रहीत करून विद्यार्थ्यांकडून तालासुरात म्हणून घ्यावीत. भिजवलेल्या मातीपासून विविध आकार तयार करून घ्यावेत.

## ३.२ बांबूकाम व वेतकाम

### बांबूचे झाड आणि त्याचे उपयोग





बांबूच्या झाडाची चित्रांद्वारे ओळख करून द्यावी. त्याचे विविध उपयोग विचारावेत.

## ३.३ फुलझाडांची व शोभिवंत झाडांची लागवड




### माझी कृती

वाळलेल्या फुलांच्या पाकळ्या चिकटवून भेटकार्ड तयार करा.

विविध फुलांची ओळख करून द्यावी. चित्राचे वर्णन करायला सांगावे. वाळलेल्या फुलांच्या पाकळ्या, पेन्सिलचा भुसा चिकटवून सुशोभन करून घ्यावे.

## (क) इतर क्षेत्र

### शेतीपूरक व्यवसाय (पशुपक्षी संवर्धन)





















## माझी कृती

चित्रातील प्राणी, पक्ष्यांचे आवाज काढा.



मांजर



बदक



कोंबडा

R8DCAX

चित्रांद्वारे प्राणी-पक्ष्यांची ओळख करून द्यावी. त्यांचे आवाज ऐकवावेत. विद्यार्थ्यांना प्राणी व पक्ष्यांचे वैयक्तिक व सामूहिक आवाज काढण्याची संधी द्यावी.